महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/ई-ऑफीस/२०२३/ 3385 दिनांक : -1 AUG 2023

## परिपत्रक

प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
उपसचिव,
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :-** **ई-ऑफिसच्या अंमलबजावणी बाबत..**

**संदर्भ :-** १. संचालनालयाचे परिपत्रक क्र.०३/तंशिसं/आयटीसेल/ई-ऑफिस/२०२३/३८, दि. १९.०७.२०२३.

२. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२४/नों.शा.,उ. व तं. शि., मंत्रालय, मुंबई. दि. १८ जूलै, २०२३.

उपरोक्त संदर्भांकीत संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये ई-ऑफिसच्या अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता दि. २०.०७.२०२३ पासून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयाकडून येणारे गोपनीय पत्र वगळता इतर सर्व टपाल ई-ऑफिसच्या माध्यमातूनच स्वीकारण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था व कार्यालय यांनी गोपनीय टपाल वगळता सर्व टपाल ई-ऑफिसच्या माध्यमातून या विभागीय कार्यालयास पाठविण्यात यावी जेणेकरुन संचालनालयास ई-ऑफिसच्या माध्यमातून पत्रव्यवहार करता येईल. त्याकरीता पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

- टपाल स्वीकृतीसाठी आवक जावक कार्यासनाना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.
- Scan झालेली टपाल संबंधित कार्यासनास वर्ग करावी.
- संबंधित कार्यासनानी पुढील कार्यवाही ई-ऑफिस मार्फत पूर्ण करावी.

सबब, या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व संस्था प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ई-ऑफिस संदर्भात काही अडचण असल्यास संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी सेल) (कार्यासन क्र.३) यांचेशी संपर्क साधून आपल्या अडचणींचे निराकरण करून घ्यावे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र.३) यांना माहितीस्तव सादर.
२. प्रोग्रामर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६९/४०३,
ई-मेल–desk3@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## परिपत्रक

जा.क्र. ०३/तंशिसं/आयटीसेल/ई-ऑफिस/२०२३/३८ दिनांक :-१९-०७-२०२३

**विषय:- ई ऑफिसच्या अंमलबजावणी बाबत**

**संदर्भ :- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२४/नों.शा., उ. व तं शि., मंत्रालय, मुंबई. दि.१८ जुलै,२०२३**

**उपरोक्त विषयाबाबत चे संदर्भीय परिपत्रक कृपया पहावे.**

याबाबत कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकानुसार ई ओफिसच्या अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता दि. २०-०७-२०२३ पासून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयाकडून येणारे गोपनीय पत्र वगळता इतर सर्व टपाल केवळ ई-ऑफिसच्या माध्यमातूनच स्वीकारण्यात येईल असे कळविण्यात आले आहे त्या अनुषंगाने संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागीय कार्यालये व शासकीय संस्था यांनी गोपनीय टपाल वगळता सर्व टपाल ई-ऑफिस च्या माध्यमातून विभागीय कार्यालयांना आणि विभागीय कार्यालयांनी संचालनालयास पाठविण्यात यावी. त्याकरिता पुढील आवश्यक कार्यवाही करावी.

- टपाल स्वीकृती साठी आवक जावक कार्यासानाना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.
- scan झालेलीं टपाल संबंधित कार्यासनास वर्ग करावी.
- संबंधित कार्यासानानी पुढील कार्यवाही ई-ऑफिस मार्फत पूर्ण करावी.

विभागीय कार्यालय यांना ई-ऑफिस संदर्भात काही अडचण असल्यास संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी सेल) शी संपर्क साधून आपल्या अडचणींचे त्वरित निराकरण करून घ्यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
26 JUL 2023
आवक क्र. ०२५४

(डॉ.विनोद म.मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

१) मा. प्रधान सचिव, उ व त. शि. मंत्रालय, मुंबई-४०००३२. यांना माहितीकरिता सविनय सादर.
२) सहसंचालक, विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर
३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाही करिता अग्रेषित..

**उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकडून ई-ऑफीस प्रणाली अंमलबजावणी करणे व टपाल ई-ऑफीस प्रणालीव्दारे स्विकारणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२४/नों.शा.**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जुलै २०२३

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. कार्यप-२०२३/ प्र.क्र.०१/१८/(र.व.का.) दि. १५ जून २०२३

**परिपत्रक**

शासकीय कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज सुरक्षित राहावे आणि निर्णय प्रक्रिया गतिमान व सुलभ व्हावी याकरीता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांत तसेच क्षेत्रीय कार्यालयांमध्ये शासकीय कामकाज ई-ऑफीस प्रणालीव्दारे करणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाने बदलत्या काळात कार्यालयीन कामकाज पध्दतीत झालेले बदल विचारात घेऊन महाराष्ट्र कार्यालयीन नियम पुस्तिका, २०२३ प्रसिध्द केली असून सदर महाराष्ट्र कार्यालयीन कामकाज पध्दती नियम पुस्तिकेच्या तरतूदीच्या अंमलबजावणीबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, तसेच अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये यांनी करणे आवश्यक असून त्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, २०२३ सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर तसेच ई- ऑफीसच्या Dashboard वर उपलब्ध करण्यात आली आहे. यापुढे उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांतील दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडताना महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, २०२३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

(२) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना क्षेत्रीय कार्यालयांकडून व नागरीकांकडून प्राप्त होणारे दैनंदिन टपाल मंत्रालय मध्यवर्ती टपाल केंद्र येथे स्विकारण्यात येत आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे टपाल खिड़की क्र.११ येथे स्विकारण्यात येत आहे. मध्यवर्ती टपाल केंद्रात प्राप्त होणारे टपाल स्कॅनींग करुन नोंदणी शाखेमार्फत संबंधित कार्यासनांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयाकडून टपाल डिजीटल स्वरुपात प्राप्त होत नसल्याने ई-ऑफीस प्रणालीव्दारे टपाल वितरण करताना ते स्कॅन करावे लागत आहे. यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे. यास्तव उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय येथे पाठवावयाचे गोपनीय पत्र वगळता इतर सर्व टपाल ई-ऑफीस प्रणालीच्या माध्यमातूनच पाठवावे.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकडून येणारे गोपनीय पत्र वगळता इतर सर्व टपाल केवळ ई-ऑफीसच्या माध्यमातूनच स्विकारण्यात येईल याची सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी नोंद घ्यावी व मंत्रालयात पाठवावयाचे टपाल ई-ऑफीसच्या माध्यमातून पाठविण्यासाठी प्रत्येक कार्यालय निहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच, सर्व कार्यालयांत टपाल स्विकृतीसाठी मध्यवर्ती ई-टपाल केंद्राची निर्मिती करावी.

(४) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी ई-ऑफीस प्रणालीची अंमलबजावणी तात्काळ करण्यासाठी काही अडचणी उदभवत असल्यास श्री. लक्ष्मीकांत गर्जे (संचालक - IT, NIC मुंबई) यांचेशी संपर्क साधावा. त्यांचा दूरध्वनी क्रमांक ९९८७४९१४४२ असा असून la.garje@nic.in ई-मेल ID आहे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०७१८१८१४२७६२०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार आणि नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F1E2B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2023.07.18 18:15:28 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (र. व का.), मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
५. संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण/ कला/ ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण (संबंधित संचालनालयामार्फत)
७. सर्व शासकीय कार्यालये , (संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण/ कला /ग्रंथालय यांच्या मार्फत)
८. सर्व उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी/राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, नों.शा.